**आनंद सागर मंगल कार्यालय** शाकाहारी करिता

एका मंगलमय कार्यासाठी लागणारी सर्व प्रकारची सेवा एकाच छताखाली. आता आनंद सागर मंगल कार्यालय येथे रात्रीच्या कार्यक्रमासाठी भव्य लॉन्स उपलब्ध.

* लग्न सोहळा * साखरपूडा * रिसेप्शन * वाढदिवस * गेट टुगेदर * कॉन्फरन्स * सांस्कृतिक कार्यक्रम

आसना बायपास चौरस्ता, गोरक्षण, जवळ, देशमुख गॅस पंपासमोर कामठा (बु.) नांदेड
व्यवस्था: स्वागत मंडप डेकोरेटर्स, मो. 9325610507,7972904719



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



**हॉटेल द्वारका**
शुध्द शाकाहारी फॅमिली रेस्टॉरंट
सौ. प्रियंका महेश वडजकर 7620987408
कोकाटे कॉम्प्लेक्स, आसना बायपास, सांगवी (बु.) हिंगोली रोड, नांदेड.



* वर्ष ६५ वे * अंक २१७ * नांदेड * शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## देशात पहिल्यांदाच जातआधारीत जनगणना, अधिसूचना जाहीर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशातील आगामी जनगणनेसाठी केंद्र सरकारने ४० प्रश्नांची अधिकृत यादी जाहीर केली आहे. महत्वाचे म्हणजे, या जनगणनेदरम्यान पहिल्यांदाच जातीशी संबंधित माहितीही विचारली जाणार आहे. याशिवाय, कौटुंबिक माहिती, शिक्षण, रोजगार, एवढेच नाही तर कोविड लसीकरणाची माहितीही विचारली जाणार आहे.

देशाचे रजिस्ट्रार जनरल मृत्युंजय कुमार नारायण यांच्या आदेशानुसार, जम्मू-कश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड राज्यांतील बर्फाच्छादित भागांत १ ते ३० सप्टेंबर दरम्यान जनगणना प्रक्रिया पार पडेल. प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती गोळा करण्यापूर्वी नागरिकांसाठी १७ ते ३१ ऑगस्ट दरम्यान 'सेल्फ एन्यूमेरेशन' अर्थात स्वतःच माहिती भरण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. तसेच, देशाच्या उर्वरित भागांमध्ये पुढील वर्षी जनगणना सुरू होईल.




जनगणनेत विचारल्या जाणाऱ्या ४० प्रश्नांमध्ये सर्वप्रथम व्यक्तीचे नाव, कुटुंब प्रमुखाशी असलेले नाते, लिंग, जन्मतारीख आणि वय, सद्य वैवाहिक स्थिती, विवाहाच्या वेळचे वय, पती किंवा पत्नीचे नाव, घोषित राष्ट्रीयत्व, धर्म, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा जात, वडिलांचा तपशील, आईचा तपशील आणि अपंगत्वाची (दिव्यांगत्वाची) माहिती विचारली जाईल. त्यानंतर मातृभाषा आणि ज्ञान असलेल्या इतर भाषा, साक्षरता आणि डिजिटल साक्षरतेची स्थिती, शिक्षण संस्थेतील उपस्थिती किंवा शिक्षणाची स्थिती, सर्वोच्च शैक्षणिक पात्रता आणि शाखा अथवा विषय, गेल्या एका वर्षादरम्यान कधीही काही काम केले आहे का, आर्थिक उपक्रमांची श्रेणी, व्यवसाय किंवा पेशा, उद्योग, व्यापार किंवा सेवेचे स्वरूप, कामगाराची श्रेणी, बिगर-आर्थिक उपक्रम, कामाच्या शोधात आहात किंवा कामासाठी उपलब्ध आहात का, आणि कामाच्या ठिकाणी ये-जा करण्याची स्थिती याबद्दल माहिती घेतली जाईल.

तसेच जन्मस्थान, शेवटचे रहिवास स्थान, स्थलांतराचे कारण, शेवटच्या स्थलांतरानंतर या गावात अथवा शहरात राहण्याचा कालावधी आणि कायमचा निवासी पत्ता नोंदवला जाईल. महिलांसाठी सध्या हयात असलेल्या मुलांची संख्या (केवळ सध्या विवाहित, विधवा, घटस्फोटित आणि विभक्त राहणाऱ्या महिलांसाठी), आतापर्यंत जन्मलेल्या एकूण हयात मुलांची संख्या, आणि गेल्या एका वर्षात जन्मलेल्या हयात मुलांची संख्या विचारली जाईल. शेवटी कोविड-१९ लसीकरणाची जागा, एकूण बँक खात्यांची संख्या, उपलब्ध असल्यास मोबाईल नंबर, उपलब्ध असल्यास आधार क्रमांक, उपलब्ध असल्यास मतदार ओळखपत्र क्रमांक, भारतीय पासपोर्टधारक असल्यास पासपोर्ट क्रमांक, आणि ड्रायव्हिंग लायसन्सची उपलब्धता याविषयीची माहिती गोळा केली जाईल.

## देशातील पोलीस, अग्निशमन दल आणि नागरी संरक्षण आणि सुधारात्मक सेवांच्या १०५७ जणांना पदके जाहीर


**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याचे औचित्य साधून देशातील पोलीस, अग्निशमन, गृहरक्षक, नागरी संरक्षण (एचजी अँड सीडी) आणि सुधारात्मक सेवा दलाच्या एकूण १०५७ जणांना पदके जाहीर झाली आहेत. काहींना शौर्य पदके तर अनेकांना सेवा पदके जाहीर झाली आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील ८२ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

यंदाच्या ३०१ शौर्य पुरस्कारांपैकी सर्वाधिक, १९७ नक्षलग्रस्त भागातील जवानांना, तर जम्मू आणि काश्मीर क्षेत्रातील ५१ जवान, ईशान्येकडील राज्यांमधील १२ आणि इतर भागातील ४१ जवानांना त्यांच्या शौर्यपूर्ण कामगिरीबद्दल प्रदान केले जात आहेत. यात महाराष्ट्रातील २० पोलीस कर्मचारी आणि १३ अग्निशमन सेवा कर्मचाऱ्यांना शौर्य पदके जाहीर झाली आहेत.

यंदा एकूण ९२ राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदके (पीएसएम) जाहीर झाली असून यात पोलीस सेवेतील ८३, अग्निशमन सेवेतील चार, नागरी संरक्षण आणि गृहरक्षक सेवेतील तीन आणि सुधारात्मक सेवेतील दोन जणांचा समावेश आहे. गुणवत्तापूर्ण सेवेसाठी एकूण ६६४ पदके (एमएसएम) जाहीर झाली असून यातील ६०६ पोलीस सेवेसाठी, २८ अग्निशमन सेवेसाठी, १८ नागरी संरक्षण आणि गृहरक्षक सेवेसाठी आणि १२ सुधारात्मक सेवेसाठी आहेत. महाराष्ट्रातील ३ पोलीस अधिकारी-कर्मचारी आणि २ सुधारात्मक सेवा कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती पदक (विशिष्ट सेवेसाठी) जाहीर झाले आहे. तसेच महाराष्ट्रातील ३७ पोलीस कर्मचारी, २ अग्निशमन सेवा कर्मचारी, ३ नागरी संरक्षण व होमगार्ड सेवा कर्मचारी आणि २ सुधारात्मक सेवा कर्मचारी यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक जाहीर झाले आहे.


**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

**रामबाण ईलाज**
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६





**सुट्टीची सूचना**

आज भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या दि. १६ ऑगस्ट २०२६ चा गोदातीर समाचारचा अंक प्रकाशित होणार नाही. वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी याची नोंद घ्यावी.

– व्यवस्थापक

स्वातंत्र्यदिन चिरायू होवो !

## पावसाचं पुन्हा कमबॅक! पुढील पाच दिवस राज्यात पावसाची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** कमी दाबाचे क्षेत्र, चक्रीय वातस्थिती आणि मान्सूनसाठी तयार झालेले पोषक वातावरण यामुळे मुंबईसह कोकण, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांत पावसाचा जोर वाढू शकतो. त्यामुळे पुढील काही दिवसांत राज्यातील पावसाचे चित्र पुन्हा बदलण्याची शक्यता आहे. दरम्यान, आजपासून पुढील पाच दिवस मुंबईसह संपूर्ण कोकण, विदर्भ, खानदेश तसेच नाशिक पुणे सातारा सांगली कोल्हापूर व छत्रपती संभाजीनगर अशा २७ जिल्ह्यांत मध्यम



ते मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. तर उर्वरित मराठवाडा आणि अहिल्यानगर व सोलापूर अशा ९ जिल्ह्यात किरकोळ पाऊस होईल, अशी शक्यता देखील हवामान विभागाने वर्तवली आहे.

महामुंबई क्षेत्रात यंदाच्या मान्सूनने चांगली कामगिरी केली आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यात मान्सून सक्रिय राहिल्याने मुंबईच्या एकूण पाऊसमानाला मोठा फायदा झाला आहे. 'एल निनो' परिस्थिती असतानाही काही दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे मुंबईतील पावसाची सरासरी गाठण्यास मदत झाली आहे.






जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# उत्सव स्वातंत्र्याचा अन् दिवस आत्मपरीक्षणाचा!

१५ ऑगस्ट हा भारतीयांच्या मनातील अभिमानाचा दिवस. १९४७ मध्ये याच दिवशी भारताने परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्त होऊन स्वातंत्र्याचा पहिला श्वास घेतला. हा दिवस तिरंगा आपल्याला केवळ भूतकाळाची आठवण करून देत नाही; तो भविष्याची जबाबदारीही सोपवतो. स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्याला स्वतंत्र भारत दिला. आता न्याय्य, समताधिष्ठित, विवेकी, सुरक्षित आणि संवेदनशील भारत निर्माण करण्याची जबाबदारी आपली आहे. या स्वातंत्र्यासाठी कित्येकांनी तुरुंगवास भोगला, यातना सहन केल्या, संसार उद्ध्वस्त केले आणि प्रसंगी हसत हसत मृत्यूला कवटाळले. त्यामुळे स्वातंत्र्यदिन हा केवळ ध्वजारोहण, राष्ट्रगीत आणि देशभक्तीपर घोषणांचा सोहळा राहू नये. हा दिवस म्हणजे आपण मिळवलेल्या स्वातंत्र्याचे काय केले, लोकशाही किती मजबूत केली आणि पुढील पिढीसाठी कोणता भारत घडवत आहोत, याचे आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. गेल्या ७९ वर्षांत भारताने केलेली वाटचाल निश्चितच अभिमानास्पद आहे. अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णतेपासून अंतराळ संशोधनापर्यंत, माहिती-तंत्रज्ञानापासून डिजिटल व्यवहारांपर्यंत आणि पायाभूत सुविधांपासून संरक्षण क्षेत्रापर्यंत भारताने मोठी झेप घेतली आहे. जगातील प्रभावशाली अर्थव्यवस्थांमध्ये भारताचे स्थान निर्माण झाले आहे. भारतीय तरुणांची क्षमता जगभर मान्य झाली आहे. ही प्रगती स्वातंत्र्याच्या प्रवासातील मोठी उपलब्धी आहे. परंतु विकासाच्या या झगमगाटामागील वास्तवाकडे डोळेझाक करता येणार नाही. देशाच्या एका बाजूला आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, बुलेट ट्रेन आणि डिजिटल अर्थव्यवस्थेची चर्चा सुरू असताना दुसऱ्या बाजूला शिक्षण, रोजगार, आरोग्य, शेती आणि मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करणारा मोठा वर्ग आजही आहे. स्वातंत्र्याची खरी परीक्षा देशाच्या आर्थिक विकासाच्या आकडेवारीत नसून समाजातील शेवटच्या घटकाच्या जीवनमानात होते. राजकीय स्वातंत्र्य मिळाले; पण सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्याचे काय? हा प्रश्न आज अधिक गंभीरपणे विचारण्याची गरज आहे. गरीब कुटुंबातील मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नसेल, तर त्याचे स्वातंत्र्य कितपत अर्थपूर्ण आहे? शिक्षित तरुणाला रोजगारासाठी भटकावे लागत असेल, शेतकऱ्याला निसर्गाच्या लहरीपणासोबत बाजारभावाच्या अनिश्चिततेशीही झगडावे लागत असेल, तर त्याच्या श्रमाला न्याय कुठे आहे? महिलांना सुरक्षित वातावरण मिळत नसेल, तर समानतेच्या घोषणा कितीही केल्या तरी त्या अपुऱ्याच ठरतात. याचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे, कारण स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. लोकशाहीने आपल्याला अभिव्यक्तीचे, विचार करण्याचे आणि प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. मात्र या स्वातंत्र्याबरोबर जबाबदारीही आली आहे. आज सामाजिक माध्यमांच्या युगात अफवा क्षणात पसरतात, खोटी माहिती समाजात विष पेरते आणि राजकीय किंवा सामाजिक मतभेद अनेकदा वैराचे रूप घेतात. मतभिन्नता ही लोकशाहीची ताकद आहे; मतभेदांमुळे शत्रुत्व निर्माण होणे ही लोकशाहीची कमजोरी आहे. प्रधानमंत्री यांना खालच्या पातळीवर जाऊन शिव्या घालणारे लोक असो की, विरोधकांचा आवाज दाबणे किंवा आपल्याशी असहमत असणाऱ्यांना देशविरोधी ठरवणे, या प्रवृत्ती कोणत्याही लोकशाहीसाठी धोकादायक आहेत. आज स्वातंत्र्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे संविधानाचे रक्षण. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार, न्यायाची हमी आणि स्वातंत्र्याची प्रतिष्ठा दिली. जात, धर्म, भाषा, प्रदेश किंवा आर्थिक स्थितीच्या आधारावर नागरिकांच्या अधिकारांमध्ये फरक पडू नये, ही संविधानाची मूलभूत भावना आहे. त्यासोबतच संविधानाने नागरिकांना काही जबाबदारी आणि कर्तव्य दिले आहेत. ते पार न पाडताच संविधानातील स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याचा कोणालाही अधिकार नाही, हे देखील लक्षात ठेवणे तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे संविधानातील मूल्ये केवळ सरकारी कार्यालयांच्या भिंतीवर किंवा भाषणांमध्ये दिसून उपयोग नाही; ती दैनंदिन व्यवहारात उतरली पाहिजेत. देशाच्या विकासासमोर पर्यावरणाचे संकटही उभे आहे. नद्या प्रदूषित होत असतील, भूजल पातळी खालावत असेल, जंगलांचे क्षेत्र कमी होत असेल आणि हवामान बदलामुळे शेतीवर परिणाम होत असेल, तर विकासाच्या मॉडेलचा पुनर्विचार करावा लागेल. आजच्या पिढीच्या गरजा भागविताना पुढील पिढ्यांचे अधिकार हिरावून घेणे म्हणजे त्यांच्या स्वातंत्र्यावरच गदा आणणे होय. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी आपण सीमेवर उभ्या असलेल्या जवानांना अभिवादन करतो. ते आवश्यक आणि स्वाभाविक आहे. मात्र देश रक्षणाची जबाबदारी केवळ सैनिकांची नाही. भ्रष्टाचाराला नकार देणारा अधिकारी, प्रामाणिकपणे काम करणारा कर्मचारी, नियम पाळणारा नागरिक, मुलांना शिक्षण देणारे पालक, पर्यावरण जपणारा समाज आणि मतदानाचा अधिकार विवेकाने बजावणारा मतदार, हे सर्व राष्ट्र निर्मितीचे सैनिकच आहेत, हेही विसरता येणार नाही. म्हणूनच १५ ऑगस्टला तिरंग्याला सलाम करताना एक प्रश्न स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे की, ज्या स्वातंत्र्यासाठी पूर्वजांनी बलिदान दिले, त्या स्वातंत्र्याचे आपण खरे वारसदार ठरलो आहोत का? देशभक्ती ही केवळ घोषणांमध्ये नसते; ती कर्तव्यपूर्तीत असते. देशावर प्रेम करणे म्हणजे केवळ राष्ट्रगीताच्या वेळी उभे राहणे नव्हे, तर देशाच्या कायद्याचा आदर करणे, सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे, कर प्रामाणिकपणे भरणे, भ्रष्टाचाराला विरोध करणे, दुर्बलांच्या पाठीशी उभे राहणे आणि सामाजिक सलोखा जपणे होय. स्वातंत्र्याचा उत्सव दरवर्षी साजरा होईल; पण स्वातंत्र्याची खरी प्रतिष्ठा तेव्हाच वाढेल, जेव्हा प्रत्येक भारतीयाला समान संधी, सन्मान आणि सुरक्षित जीवन मिळेल. म्हणून १५ ऑगस्ट हा केवळ उत्सवाचा दिवस न राहता तो स्वतःला आणि व्यवस्थेला आरसा दाखविण्याचा दिवस ठरला पाहिजे. हाच स्वातंत्र्याचा खरा अर्थ आणि हाच स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाला सच्चा सलाम!

# भारतीय स्वातंत्र्य दिन चिरायू होवो!



देश असो की माणूस, त्याच्या जडणघडणीचा आणि उभारणीचा काळ मोठा कठीण आणि खडतर असतो. अनेक आव्हानांना सामोरं जातांना त्याच्या खंबीरतेचा कस लागतो! त्याच अनुषंगाने आज आपण बघता बघता भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करून शतकाकडे यशस्वी वाटचाल करत आहोत! भारतीय स्वातंत्र्य समर आणि त्या दिवसांची केवळ आठवण जरी काढली तरी संपूर्ण संघर्षपट सर्रकन डोळ्या-समोरून जातो! एक दिवस असा होता की, इथला प्रत्येक भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रचंड आसुसलेला होता. सर्वप्रथम भारतीय उच्चविद्याविभूषित तरुण आणि विचारवंत जेंव्हा पाश्चिमात्य जगातून उच्च शिक्षण घेऊन आले, तेंव्हा त्यांना देश नावाची संकल्पना लक्षात आली. भारताला हजारो वर्षांचा देदीप्यमान इतिहास होता, परंतु तो देश म्हणून एकसंध नसून त्याचा इतिहास एकजुटीचा नव्हता. एवढा विशालकाय भारताचा भूप्रदेश आणि इतिहास जरी समृद्ध असला तरी इथला प्रत्येक राजा आपआपल्या प्रदेशाचा प्रमुख होता. भारत देशात अनेक राजे आपली विरासत सांभाळून होते. बऱ्याच राजांचे आपसांत वैर असल्याकारणाने भारत देश असूनही खंडप्राय होता. याचाच परिपाक म्हणजे अनेक परकीय आक्रमकांनी भारत पुरता खिळखिळा केला. प्लासीच्या लढाईने ब्रिटिशांनी १७५७ साली आपली सत्ता भारतात स्थापन केली आणि त्यानंतर मात्र भारतातील विविध संसाधने आणि मौल्यवान गोष्टी पश्चिमेकडे जायला सुरुवात झाली. आपला देश

**जहाँ डाल डाल पर सोने**
**की चिड़िया करती है बसेरा।**
**वो भारत देश है मेरा,**
**वो भारत देश है मेरा ।।**

असतांना इथे सोन्याचा धूर निघत होता. देश समृद्ध असतांना येथील एकेक गोष्टी परदेशी गेल्या. इंग्रजांनी फोडा आणि झोडा तसेच 'फोडा आणि राज्य करा' या धूर्त नीतीने इथली अनेक छोटी छोटी राजे खालसा केली. सर्व राजांना आपली संस्थाने खालसा झाल्यानंतर ही ब्रिटीश धूर्त नीती लक्षात आली, परंतु तोपर्यंत वेळ निघून गेली होती. हे कळायला शंभर वर्षे जावी लागली आणि १८५७ साली सुरु झाला भारतीय स्वातंत्र्याचा पाहिला १८५७ चा लढा आणि तेंव्हाच भारतीयांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचे महत्व कळायला लागले !

१८५७ ते १९४७ हा काळ म्हणजे तब्बल नव्वद वर्षांचा अविरत-अथक संघर्ष काळ आणि तेंव्हा कुठे भारतीय स्वातंत्र्याची पहाट झाली! मुस्लीम आक्रमकांनी भारत पुरता लुटून नेला असतांना बाकीचे पिळून नेण्याचे काम इंग्रजांनी केले. इथल्याच लोकांना हातासी धरून देशाची राजरोस लुट होत होती. विसावे शतक उजाडले तेंव्हा मात्र भारतीय स्वातंत्र्य लढा संपूर्ण देशभर पेटला गेला. ब्रिटीश मात्र सहजासहजी भारत देश सोडायला तयार नव्हते. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने आपला लढा कायम सुरूच ठेवला. त्यात दोन गट पडले. महात्मा गांधीजी अहिंसा-असहकार-उपोषण या मार्गाने ब्रिटिशांचे मन आणि मत परिवर्तन करण्याच्या विचाराचे असतांना दुसरीकडे लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस, सुखदेव, भगत सिंग, राजगुरू आदि जहाल विचाराच्या क्रांतीकारकांना ठोशास ठोसा असे उत्तर द्यावे असे वाटत होते. दोन्ही विचारांचे लक्षमात्र एकच होते, ते म्हणजे भारतीय स्वातंत्र्य !

दुर्दैवाने या काळात अनेक देशभक्तांना स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती द्यावी लागली! अनेक निष्पाप लोक इंग्रजांच्या गोळ्यांचे शिकार झाले, अनेकांचा लाठ्याकाठ्यानी जीव घेतला तर अनेकांना देशद्रोहाखाली फासी झाली! याचा परिपाक म्हणजे तरूण स्वातंत्र्य विरांचे रक्त उसळून आले. कोणत्याही परिस्थितीत इंग्रज भारत देश सोडायला तयार नसतांना भारतीय क्रांतीकारकही जिद्दीला पेटले होते. चले जाव!, भारत छोडो!, तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आझादी दुंगा!, स्वातंत्र्य मिळवणे हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच! इन्कलाब जिंदाबाद! सारख्या घोषणांनी संपूर्ण देश दणाणला! भारतीयांच्या नसानसात स्वातंत्र्याची लहर संचारली! त्यातच भगत सिंग, सुखदेव आणि राजगुरू या क्रांतीकारकांना ब्रिटिशांनी देशद्रोहाच्या गुन्ह्याखाली फासावर लटकवले! यानंतर मात्र भारतीय स्वातंत्र्य आंदोलन पेटले गेले! एका भगत सिंगाच्या बलिदानातून हजारो भगत सिंग निर्माण झाले! आता तरुणांनी देशातील स्वातंत्र्य आंदोलन हातात घेतले. गांधीजींचा अहिंसेचा मार्ग तरुणांनी बाजूला ठेवला, मात्र गांधीजींचे असहकार आंदोलन चालूच होते. आता इंग्रजांना सुद्धा जाणीव झाली की; आपण भारताला स्वातंत्र्य बहाल केले पाहिजे. त्यातच दुसरे महायुद्ध संपत आले होते, ब्रिटनमध्ये क्लेमेंट ॲटलीचे सरकार आले आणि १९४७ साली आज दिनी म्हणजेच १५ ऑगस्ट रोजी इंग्रज भारत देश सोडून गेले आणि भारताने स्वातंत्र्याचा श्वास घेतला!

सज्जनहो, इतिहासाचे आपण सहज सिंहावलोकन केले असता अनेक आव्हानं आपण लीलया पेलली असली तरी आपला संघर्ष संपलेला नाही. मागील ८० वर्षात सर्वात जमेची बाजू म्हणजे आपण आपले स्वातंत्र्य अनमोल संविधानाच्या सहाय्याने अबाधित ठेवले आहे! स्वातंत्र्याएवढेच मोलाचे शस्त्र आणि शास्त्र म्हणजे भारतीय संविधान असून त्या माध्यमातून अनेक बाबींना देशहिताच्या अनुषंगाने कृती सुरु आहेत! अनेक प्रश्न आपल्यासमोर असतांना याहीपेक्षा जल्लोषात स्वातंत्र्याचा शतक महोत्सव साजरा करायचा असेल तर काही कटू निर्णय घ्यावे लागतील. सीमा सुरक्षिततेकडे लक्ष देऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाने आपले स्थान मजबूत केले पाहिजे. महागाईवर नियंत्रण ठेवून मानवी संसाधनांचा आणखी विकास करावा लागेल. तरुणांच्या हाताला काम उपलब्ध करावे लागेल, गरीब-श्रीमंत दरी कमी करण्यासाठी संपती संचय बाबतीत कठोर पावले उचलून संपूर्ण संपत्तीची मोजदाद होणे गरजेचे आहे. तद्वतच प्रचंड संपत्ती असलेल्या लोकांनी देशासाठी आपली संपत्ती देऊ करावी लागेल, जेणे करून भारताची श्रीलंका, नेपाळ होणार नाही! तसेच भारतीय राजकारणी आणि अधिकारी वर्गाने या बाबी कटाक्षाने पाहून पुढे यावे लागेल. अमेरिकेसारख्या शस्त्रास्त्र व्यापारी देशाचे वर्चस्व कमी करावे लागेल. लोकशाहीत मतदानाच्या बाबतीत लोकांमध्ये विश्वासार्हता निर्माण करावी लागेल. तसेच राजकारण स्तरावर धार्मिक, जातीय कट्टरता थांबवून सहिष्णुता रुजवावी लागेल. असे झाल्यास आपला देश जगात एक क्रमांकावर गेल्याशिवाय राहणार नाही. तेंव्हा आज स्वातंत्र्यदिनी जात, धर्म, पंथ बाबतीत एकात्मता टिकवून ठेवण्याचे आपण देशाला अभिवचन देऊयात! असे झाल्यास प्रत्येक भारतीय ढोल-ताशे लावून दरवर्षी स्वातंत्र्य उत्सव साजरा करेल! भारतीय स्वातंत्र्यदिन चिरायू होवो!

**-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**
कै. रमेश वरपूडकर
महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी
(महाराष्ट्र)
मो. ९१५८०६४०६८

# कालचा संघर्ष, आजचे स्वातंत्र्य आणि उद्याचा विकसित भारत!

कालचा संघर्ष, आजचे स्वातंत्र्य आणि उद्याचा विकसित भारत! हे केवळ शब्द नाहीत, तर भारताच्या गौरवशाली प्रवासाची कहाणी आहे. ज्या स्वातंत्र्यासाठी असंख्य वीरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, ज्यासाठी लाखो भारतीयांनी अन्यायाविरुद्ध संघर्ष केला, ते स्वातंत्र्य आपल्याला १५ ऑगस्ट १९४७ रोजी मिळाले. आज आपण स्वातंत्र्याच्या मोकळ्या आकाशाखाली श्वास घेतो, तिरंगा अभिमानाने फडकवतो आणि लोकशाहीचे अधिकार उपभोगतो. मात्र, स्वातंत्र्य मिळवणे हा प्रवासाचा शेवट नव्हता; तर एका नव्या भारताच्या निर्मितीची ती सुरुवात होती.

आजचा भारत विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, शेती, उद्योग आणि अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात वेगाने पुढे जात आहे. या प्रगतीला अधिक वेग देऊन आत्मनिर्भर, समृद्ध, सक्षम आणि विकसित भारत घडवण्याची जबाबदारी आजच्या पिढीच्या खांद्यावर आहे. म्हणूनच, स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाचे स्मरण करताना आपण एक संकल्प करूयादेशाने आपल्याला स्वातंत्र्य दिले; आता आपल्या कर्तृत्वाने देशाला विकासाची नवी उंची देऊया!

भारताचे स्वातंत्र्य हे अनेक वर्षांच्या संघर्षाचे आणि असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचे फलित आहे. ब्रिटिश राजवटीत भारतीयांना राजकीय, आर्थिक आणि सामाजिक अन्याय सहन करावा लागत होता. या अन्यायाविरुद्ध १८५७ चा उठाव झाला आणि पुढे स्वातंत्र्यलढ्याला व्यापक स्वरूप प्राप्त झाले.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग आंदोलन आणि भारत छोडो आंदोलन यांसारख्या चळवळी झाल्या. त्याचबरोबर भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, नेताजी सुभाषचंद्र बोस, लोकमान्य टिळक, सरदार पटेल आणि असंख्य ज्ञात-अज्ञात वीरांनी देशासाठी त्याग केला. अनेकांनी तुरुंगवास भोगला, अत्याचार सहन केले आणि आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या अथक संघर्षामुळे अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. त्यामुळे आज आपण अनुभवत असलेले स्वातंत्र्य हे त्यांच्या त्यागाची अमूल्य देणगी आहे. १५ ऑगस्ट १९४७ हा भारतीय इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिलेला दिवस आहे. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर भारत ब्रिटिश राजवटीतून स्वतंत्र झाला आणि देशाने स्वातंत्र्याची पहाट अनुभवली. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू झाले. त्यांनी लाल किल्ल्यावर तिरंगा फडकावून स्वतंत्र भारताच्या नव्या पर्वाची सुरुवात केली.

स्वातंत्र्य मिळाल्याचा हा क्षण प्रत्येक भारतीयासाठी अभिमान, आनंद आणि नव्या आशेचा होता. अनेक वर्षे ज्या स्वराज्याचे स्वप्न भारतीयांनी पाहिले होते, ते अखेर साकार झाले. मात्र, या आनंदाच्या क्षणासोबतच भारताच्या फाळणीचे दुःखही जोडलेले होते. फाळणी-मुळे मोठ्या प्रमाणावर हिंसाचार, स्थलांतर आणि मानवी दुःखाला सामोरे जावे लागले. म्हणूनच १५ ऑगस्ट हा केवळ स्वातंत्र्याचा उत्सव नसून, त्यामागील संघर्ष, बलिदान आणि इतिहासाचे स्मरण करण्याचा दिवस आहे. या स्वातंत्र्याची जपणूक करून देशाला प्रगतीच्या नव्या शिखरावर नेणे हीच आपल्या स्वातंत्र्यवीरांना खरी आदरांजली आहे. आज आपण स्वतंत्र भारतात लोकशाही, समानता आणि संविधानिक अधिकारांसह स्वाभिमानाने जीवन जगत आहोत. स्वातंत्र्यामुळे प्रत्येक नागरिकाला आपले मत मांडण्याचा, शिक्षण घेण्याचा, मतदान करण्याचा आणि समान संधी मिळवण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. हीच आपल्या लोकशाहीची खरी ताकद आहे. मात्र, स्वातंत्र्य म्हणजे केवळ हक्क मिळणे नव्हे, तर त्या हक्कांसोबत आपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडणेही होय. संविधानाचा आदर करणे, कायद्याचे पालन करणे आणि देशाच्या एकता व अखंडतेचे रक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

आजच्या काळात भ्रष्टाचार, जातीय भेदभाव, अंधश्रद्धा, हिंसा, सामाजिक विषमता आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांसारखी अनेक आव्हाने आपल्या समोर आहेत. या समस्यांकडे केवळ सरकारची जबाबदारी म्हणून न पाहता, प्रत्येक नागरिकाने आपल्या परीने सकारात्मक योगदान दिले पाहिजे. आपण स्वच्छता राखणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे, गरजूंची मदत करणे, स्त्री-पुरुष समानतेचा आदर करणे आणि समाजात बंधुभाव वाढवणे यांसारख्या छोट्या-छोट्या कृतींमधून देशाच्या प्रगतीला हातभार लावू शकतो. खरे स्वातंत्र्य तेव्हाच सार्थ ठरेल, जेव्हा प्रत्येक नागरिक आपल्या हक्कांचा योग्य वापर करून कर्तव्यांचीही प्रामाणिकपणे पूर्तता करेल.

स्वातंत्र्यानंतर भारताने अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, अवकाश संशोधन, डिजिटल सेवा, उद्योग, शेती, शिक्षण आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांत भारताने आपली क्षमता सिद्ध केली आहे. आज भारतातील वैज्ञानिक, अभियंते, शेतकरी, उद्योजक, शिक्षक आणि कामगार देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. भारतीय तरुणाई ही देशाची सर्वात मोठी शक्ती आहे. स्टार्टअप, नवउद्योग, संशोधन, तंत्रज्ञान आणि कौशल्यविकासाच्या माध्यमातून तरुण नवनवीन संधी निर्माण करत आहेत. त्यांच्या कल्पकतेमुळे रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना मिळत आहे.



त्याचप्रमाणे महिलांचा वाढता सहभाग हा भारताच्या प्रगतीचा महत्त्वाचा टप्पा आहे. शिक्षण, रोजगार, उद्योग, विज्ञान, क्रीडा, प्रशासन आणि नेतृत्वाच्या विविध क्षेत्रांत महिला उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. भारताची विविधता, लोकशाही व्यवस्था आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा ही देशाची मोठी ताकद आहे. विकसित भारत म्हणजे केवळ मोठी अर्थव्यवस्था नव्हे, तर प्रत्येक नागरिकाच्या जीवनात सुख, सुरक्षितता, समान संधी आणि गुणवत्तापूर्ण सुविधा निर्माण करणारा भारत होय. प्रत्येक व्यक्तीला दर्जेदार शिक्षण, उत्तम आरोग्यसेवा, रोजगाराच्या संधी आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील विकासातील अंतर कमी करून गावागावात आधुनिक सुविधा पोहोचल्या पाहिजेत. शेतकरी, कामगार, महिला, युवा आणि वंचित घटकांना विकासाच्या प्रवाहात समान संधी मिळाल्या पाहिजेत. विकासासोबत पर्यावरणाचे संरक्षण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. स्वच्छ हवा, पाणी, हिरवीगार जंगले आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करून शाश्वत विकास साधला पाहिजे. आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना भारतीय संस्कृती, परंपरा, मूल्ये आणि संविधानिक विचारांची जपणूक केली पाहिजे. असा सर्वसमावेशक आणि आत्म निर्भर भारत हेच आपल्या स्वातंत्र्यवीरांच्या स्वप्नांना योग्य उत्तर ठरेल.

आजचा विद्यार्थी आणि तरुण हा उद्याच्या भारताचा शिल्पकार आहे. देशाचे भविष्य घडवण्यासाठी तरुणांनी केवळ शिक्षण घेणे पुरेसे नाही, तर ज्ञानासोबत कौशल्य, शिस्त, प्रामाणिकपणा, सर्जनशीलता आणि राष्ट्रभक्ती आत्मसात करणे आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियाचा जबाबदारीने आणि विवेकाने वापर केला पाहिजे. खोटी माहिती, अफवा, द्वेष आणि समाजात फुट पाडणाऱ्या विचारांपासून दूर राहून सकारात्मक विचारांचा प्रसार करणे गरजेचे आहे. तरुणांनी संशोधन, नवकल्पना, तंत्रज्ञान, उद्योजकता आणि कौशल्यविकासाला प्राधान्य दिले पाहिजे. नोकरीच्या शोधात राहण्याबरोबरच नवीन रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनण्याची मानसिकता विकसित केली पाहिजे.

माझा देश ही भावना केवळ घोषणेत न राहता आपल्या कृतीत दिसली पाहिजे. आपल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करून देशाच्या प्रगतीत योगदान देणे हीच खरी राष्ट्रसेवा आहे. देशाचा विकास केवळ सरकारच्या प्रयत्नांवर अवलंबून नसतो. जबाबदार, जागरूक आणि कर्तव्यनिष्ठ नागरिक हे मजबूत राष्ट्राचे आधारस्तंभ असतात. प्रत्येक नागरिकाने सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे, परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी व वीज वाचवणे आणि पर्यावरणाचे संवर्धन करणे आवश्यक आहे. वाहतूक नियमांचे पालन करणे आणि कायद्याचा आदर करणे हीदेखील आपली मूलभूत जबाबदारी आहे.

लोकशाही मजबूत करण्यासाठी मतदानाचा अधिकार जबाबदारीने वापरणे आणि योग्य माहितीच्या आधारे निर्णय घेणे महत्त्वाचे आहे. जात, धर्म, भाषा किंवा प्रदेश यांच्या भेदांपलीकडे जाऊन राष्ट्रीय एकात्मता, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा जपला पाहिजे.

आपण विद्यार्थी असो, शेतकरी असो, कामगार असो, शिक्षक असो किंवा उद्योजक आपापल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे आणि उत्कृष्टतेने काम करणे हेच देशसेवेचे प्रभावी माध्यम आहे. काल आपल्या स्वातंत्र्यवीरांनी संघर्ष केला. आज आपण त्या स्वातंत्र्याचा उपभोग घेत आहोत. उद्या हे स्वातंत्र्य अधिक समृद्ध, सक्षम आणि विकसित भारताच्या निर्मितीत रूपांतरित करणे ही आपली जबाबदारी आहे. ज्यांनी काल स्वातंत्र्यासाठी रक्त सांडले, त्यांच्या बलिदानाला आज आपण आपल्या कर्तृत्वाने सलाम करूया; आणि उद्या विकसित, आत्मनिर्भर, शक्तिशाली व समृद्ध भारत घडवण्याचा संकल्प करूया! जय हिंद! वंदे मातरम्!

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो. ९८६७८३०४९८

# तिरंगा देशाची आण-बाण-शान



शहिदांच्या आठवणी पुन्हा-पुन्हा जागृत व्हाव्यात व नवीन पिढीला शहिदांची, क्रांतिकारकांची, थोर महात्म्यांची आठवण निरंतर हृदयात रहावी व इतिहास जागृत रहावा या दृष्टीकोणातून १५ ऑगस्टला प्रत्येक घरावर तिरंगा फडकवून देशाची आण-बाण-शान उंचावण्यासाठी सर्वांनीच अग्रेसर रहायला हवे. कारण तिरंगा भारतासाठी व भारतातील प्रत्येक नागरिकांसाठी अनमोल रत्न आहे. कारण यातूनच क्रांतीची मशाल उदयास आली व १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उजाडला. यात सूर्याचा प्रखर तेजोमय प्रकाश, चंद्राची शांतीमय प्रतिमा, लखलखत्या ताऱ्यांचे प्रकाशमय वातावरण निर्माण करणे आणि वायू देवतेच्या सहवासाने विराजमान होऊन देशाच्या शुरवीरांना व क्रांतिकारकांना तिरंगा सांगतो की, मेरा देश महान.

देशातील वाढते प्रदूषण व दिवसेंदिवस कमी होत असलेले ऑक्सिजनचे प्रमाण यामुळे पृथ्वीतला-वरील संपूर्ण जीवजंतू भयभीत आहे. याकरिता १५ ऑगस्टचे औचित्य साधून देशातील प्रत्येक राज्यांनी १५ ऑगस्टला झाडे लावण्याचा संकल्प करावा. कारण वृक्षलागवडीमुळे देशातील वातावरण प्रफुल्लित होईल व आपले पूर्वज आशीर्वाद देतील आणि त्यांना अभिमान होईल की स्वतंत्र भारतात सर्वकाही ठीक आहे. वृक्षलागवडीमुळे गुरांना चारा, सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मदत होईल. आपल्या पूर्वजांनी अनेक कठीण प्रसंगांशी सामना करत १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले

आज भारताला स्वतंत्र होऊन ७९ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने देशात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने संपूर्ण भारतात जय्यत तयारी सुरू आहे.ही अत्यंत आनंदाची व स्वागतार्ह बाब आहे. देश स्वतंत्र करण्यासाठी अनेक थोर महात्मे, क्रांतिकारक, जहालवादी व मवाळवादी नेते यांच्या एकसूत्री कार्यक्रमाने व बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात मोकळा श्वास घेत आहोत. त्याकाळी स्वातंत्र्यासाठी घराघरांतून आवाज बुलंद व्हायचा व स्वातंत्र्यासाठी संघर्षमय वातावरण निर्माण करून संपूर्ण युवावर्ग इंग्रजांशी टक्कर घेण्यासाठी काहीही करायला तयार रहायचे. आज आपल्याला आपल्या क्रांतिकारकांचे, शहिदांचे, थोर महात्म्यांचे अनुकरण करून त्यांनी मिळवून दिलेल्या स्वातंत्र्याची आठवण म्हणून आणि देश स्वतंत्र होऊन ७९ वर्षे पूर्ण होत असल्याचे पाहून प्रत्येकांनी १५ ऑगस्टला आपापल्या घरांवर तिरंगा फडकवीलाच पाहिजे असा पन देशाच्या १४५ कोटी जनतेने केला पाहिजे.

आज देशाची स्थल सेना, वायुसेना, नौसेना तिरंग्याचा स्वाभिमान कायम रहावा यासाठी अग्रेसर असून, अहोरात्र देशाच्या सुरक्षेसाठी तत्पर आहेत. त्यामुळेच देशाची १४५ कोटी जनता सुरक्षित असून, मोकळा श्वास घेत आहे. तिरंगा देशासाठी व देशातील सीमावर्ती भागातील संपूर्ण सैनिकांसाठी व कानाकोपऱ्यातील भारतीयांसाठी भारतमातेचा आत्मा आहे. जय हिंद!

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो.९९२१६९०७७९

# तिरंग्याचा अवमान होणार नाही याची दक्षता घेऊया!

भारत सरकारचा हर घर तिरंगा या देशव्यापी मोहिमेच्या अंतर्गत प्रत्येक घरावर तिरंगा लावण्याचे आवाहन केले गेले आहे. या मोहिमेचे यंदाचे पाचवे पर्व आहे. जनमानसांत देशभक्ती रुजावी हा यामागील प्रमुख उद्देश आहे. राष्ट्रप्रेमाचे प्रतीक म्हणून स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या घरावर तिरंगा लावणे हा स्तुत्य उपक्रम असला तरी या ध्वजाचा उचित सन्मान राखणेही आपले आद्यकर्तव्य आहे. ध्वजसंहितेनुसार राष्ट्रध्वजाचा अवमान हा दखलपात्र गुन्हा आहे.

सध्या सर्वत्र पावसाळा सुरु आहे. श्रावण महिना सुरु झाल्याने पावसाचा लहरीपणा प्रकर्षाने जाणवू लागला आहे. अधूनमधून कोसळणाऱ्या पावसामुळे झेंडा भिजून खराब होणार नाही, तो खाली झुकणार नाही याची प्रत्येकानेच काळजी घ्यायला हवी. भारताची विजयपताका सतत डौलत राहावी यासाठी आपल्याच एकाच पिढीने अपरिमित त्याग केला आहे. छातीवर गोळ्या झेलल्या आहेत, बलीवेदीवर फासाचे दोरखंड कवटाळले आहेत. याच तिरंग्याच्या रक्षणासाठी आपले सैन्यदल आज थंडी, ऊन वारा आणि पावसाची तिळमात्र तमा न बाळगता सीमेवर जागता पहारा देत आहे. घरावर तिरंगा लावताना आपल्याला आपल्या क्रांतिकारकांची आणि सीमेवर प्राणपणाने लढणाऱ्या सैनिकांची आठवण आणि त्यांच्याप्रती कृतज्ञतेचा भाव मनी ठेवायला हवा आणि त्या तिरंग्याचा अवमान होणार नाही याची दक्षताही घ्यायला हवी !

**-जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

# स्वारातीम विद्यापीठात 'रॅगिंग प्रतिबंध व पोक्सो' विषयावर कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर संपन्न

## विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जनजागृतीसह सुरक्षित शैक्षणिक वातावरण निर्मितीवर भर

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या वार्षिक सामान्य किमान कार्यक्रमांतर्गत तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड यांच्या सहकार्याने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे 'रॅगिंग प्रतिबंध व पोक्सो' या विषयावर कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी विकास विभाग आणि विद्यार्थी विकास कक्ष समितीच्या पुढाकाराने आयोजित या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जनजागृती निर्माण करणे, रॅगिंगसारख्या गैरप्रकारांना प्रतिबंध करणे तसेच सुरक्षित, संवेदनशील आणि सकारात्मक शैक्षणिक वातावरण निर्माण करणे हा होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, डॉ. संगीता माकोने तसेच विद्यापीठाचे विधी अधिकारी विनायक भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रमुख मार्गदर्शक म्हणून न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेडचे सचिव शरद देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी रॅगिंगविरोधी कायदे, रॅगिंगचे विद्यार्थ्यांच्या मानसिक व शैक्षणिक जीवनावर होणारे परिणाम, रॅगिंगला प्रतिबंध करण्यासाठी असलेल्या कायदेशीर तरतुदी तसेच विद्यार्थ्यांचे कायदेशीर अधिकार व जबाबदाऱ्या याबाबत सविस्तर माहिती दिली. कोणत्याही प्रकारच्या रॅगिंगला प्रोत्साहन न देता त्याविरोधात सजगपणे भूमिका घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच ड. एम. आर. मुधोलकर, ड. शेख शकील आणि ड. वैद्य यांनी पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून 'रॅगिंग प्रतिबंध' आणि 'पोक्सो' कायद्याविषयी सखोल मार्गदर्शन केले. पोक्सो कायद्याची पार्श्वभूमी, बालकांचे संरक्षण, लैंगिक अत्याचाराचे विविध प्रकार, कायद्यातील तरतुदी, तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया आणि विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी याबाबत विविध उदाहरणांच्या माध्यमातून माहिती देण्यात आली. कायद्याचे ज्ञान हे केवळ अधिकारांच्या संरक्षणासाठी नव्हे, तर स्वतःचे आणि इतरांचे संरक्षण करण्यासाठीही आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी विद्यापीठ परिसरात विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि निर्भय वातावरण उपलब्ध करून देणे ही विद्यापीठाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी कायद्याची माहिती करून घेत त्याचा सकारात्मक वापर करावा तसेच विद्यापीठातील शिस्त, परस्पर सन्मान आणि संवेदनशीलता यांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुरक्षित आणि शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण अत्यावश्यक असल्याचे नमूद केले. कायदेविषयक जनजागृतीचे असे उपक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या अधिकारांसोबतच कर्तव्यांची जाणीव करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतात, असे त्यांनी सांगितले.

# सीईओ महेश पाटील यांचा हदगाव व अर्धापूर तालुक्यांचा दौरा; विकास कामांचा आढावा

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी बुधवार, दि. १२ ऑगस्ट रोजी हदगाव व अर्धापूर तालुक्यांचा दौरा करून विविध विकास कामांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक मयूरकुमार आंदेलवाड, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, हदगावचे गटविकास अधिकारी डी. के. आडेराघो तसेच अर्धापूरचे गटविकास अधिकारी यू. डी. तोटवाड उपस्थित होते.

हदगाव पंचायत समितीच्या सभागृहात झालेल्या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी प्रधानमंत्री आवास योजना, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान, व्हीबी-जी-रामजी, रमाई योजना, ग्रामपंचायत विभाग,



आरोग्य, शिक्षण, बांधकाम, जलजीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशनसह विविध विकास योजनांचा विभागनिहाय आढावा घेतला.

यावेळी त्यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त राबविण्यात येणाऱ्या हर घर तिरंगा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले. १५ ऑगस्ट रोजी गावस्तरावर होणाऱ्या ग्रामसभेत शासनाच्या विविध योजनांची माहिती ग्रामस्थांना द्यावी, घरकुल योजनांच्या अंतिम याद्या ग्रामसभेत वाचून दाखवाव्यात तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार घनकचरा व्यवस्थापना-बाबत जनजागृती करून कचऱ्याचे विलगीकरण प्रभावीपणे राबविण्याचे नियोजन करावे, असे त्यांनी सांगितले.

सोळाव्या वित्त आयोगांतर्गत आवश्यक विकास आराखडे वेळेत तयार करून निधीची तरतूद करण्याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच लेखापरीक्षण वेळेत पूर्ण करणे, कर्मचाऱ्यांची उपस्थिती बायोमेट्रिक प्रणालीद्वारे घेणे तसेच विविध विकास योजनांच्या अंमलबजावणीत गती आणण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

यानंतर अर्धापूर पंचायत समिती येथे सर्व विभाग प्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत घरकुल योजनेच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अंगणवाडी विकासासाठी वित्त आयोगाच्या दहा टक्के निधीतून आवश्यक तरतूद करण्याच्या सूचनांसह विविध विभागांच्या कामांचा आढावाही मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी घेतला. या बैठकीत गटशिक्षणाधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, कृषी अधिकारी, उपअभियंता, संबंधित विभागाचे विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आदींची उपस्थिती होती.

# कुंडलवाडीत भांड्याचे गोडाऊन फोडून तांब्या-पितळी भांडी चोरणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** शहरातील चुंगी नाका रोडवरील भांड्याच्या गोडाऊनचे कुलूप तोडून तांब्या-पितळीची भांडी चोरणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा कुंडलवाडी पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी चार आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून सुमारे ४७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी अनिल पि. मारोती शिंदे (वय ३८), व्यवसाय भांडे दुकान, रा. हरनाळी, ता. बिलोली यांच्या चुंगी नाका रोडवरील गोडाऊनमध्ये १२ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२ ते ३ वाजेदरम्यान चोरी झाली. चोरट्यांनी गोडाऊनच्या दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि तांब्या-पितळेची भांडी चोरून नेली.



या प्रकरणी कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ९३/२०२६, कलम ३३१(३), ३०५ भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये १२ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४.३७ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान पोलिसांनी सायलू पि. नागय्या बिंगी (वय ३८), पोरेड्डी पि. गंगाराम उर्फ पोरेड्डी इडबिडी (वय ४३), येनकवा ध. कृष्णा अन्ना (वय ५१) आणि गंगामणी ध. सायलू बिंगे (वय ३३) या चार आरोपींना अटक केली.

आरोपींकडून ४७ हजार रुपये किमतीची तांब्या-पितळेची भांडी, टमाटा आकाराचे भांडे, पाण्याचे हांडे, प्लेट, गंगा-जमुना घागर, टोपले व इतर साहित्य असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

आरोपींनी संगनमत करून चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यांनी फिर्यादीच्या मालकीच्या गोडाऊनचे कुलूप तोडून आत प्रवेश करून वरील मुद्देमाल चोरून नेल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील आणि उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाई पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय गिरी, पोहेकॉ संतोष सगेंवार, मपोहेकॉ अरुणा श्रीवास्तव, पोकॉ व्यंकट घोंगडे, पोकॉ आनंद बोडके, चालक पोहेकॉ रामेश्वर पाटील तसेच होमगार्ड हर्षवर्धन जाधव, अण्णाराव जाधव, सुनील रामपुरे आणि साहेबराव काळे यांचा समावेश होता. गुन्ह्याचा पुढील तपास पोहेकॉ संतोष संगेवार करीत आहेत.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासकीय योजनांचा लाभ द्या –ॲड. निलेश हेलोंडे पाटील

## चारा टंचाई टाळण्यासाठी चारा लागवड करा

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांच्या घरी प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्या अडीअडचणी जाणून घ्याव्यात. पात्र कुटुंबियांना सर्व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी संबंधित विभागांनी तत्परतेने कार्यवाही करावी, असे निर्देश कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात ॲड. हेलोंडे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) हनुमंत कोळेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके, सहायक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार घुले, जिल्हा उपनिबंधक शाहुराज हिरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मागील दीड वर्षात नांदेड जिल्ह्यात २४४ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. ही बाब गंभीर असल्याचे नमूद करून ॲड. हेलोंडे पाटील यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांच्या घरी भेटी देऊन त्यांच्या समस्या जाणून घेण्याच्या सूचना दिल्या. तसेच संबंधित कुटुंबांना शासनाच्या



विविध योजनांचा लाभ मिळतो आहे किंवा नाही, याची खातरजमा करून पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून द्यावा, असे त्यांनी सांगितले. आत्महत्याग्रस्त प्रकरणांमध्ये मदत देण्यात आलेली प्रकरणे तसेच चौकशीसाठी प्रलंबित प्रकरणांचा त्यांनी आढावा घेतला.

अल निनोच्या पार्श्वभूमीवर भविष्यात चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासकीय गायरान जमीन, शेताच्या बांधावर, जलसंधारणाची कामे झालेल्या नाल्यांच्या दुतर्फा चारा लागवड करण्याचे नियोजन करावे, अशा सूचना ॲड. हेलोंडे पाटील यांनी दिल्या. आरोग्य विभागाने प्रेरणा प्रकल्पाच्या माध्यमातून आत्महत्याग्रस्त कुटुंबियांचे समुपदेशन करावे. तसेच त्यांना आरोग्य सुविधा व आरोग्य शिबिरांचा लाभ मिळवून द्यावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

# एमजीएममध्ये पद्मश्री रंगनाथन जयंती संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालय आणि एमजीएम ग्रंथालयशास्त्र महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने संचालिका डॉ. गीता लाठकर यांच्या मार्गदर्शनात अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात दि. १२ ऑगस्ट रोजी भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक तथा पितामह डॉ. पद्मश्री शियाली रामामृत रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली.

अभियांत्रिकी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिरिष कोटगीरे आणि शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. अर्चना राजूरकर यांच्या हस्ते रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. गोविंद हंबर्डे यांनी उपस्थितांना पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या महान कार्याची ओळख करून दिली. डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा जन्मदिवस भारतात ग्रंथपाल दिवस म्हणूनही साजरा करण्यात येतो. या दिवसाचे औचित्य साधून ग्रंथालयात डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमास विभागप्रमुख डॉ. जसबीरसिंग सिद्धू, डॉ. कल्पना पैठणे-जोंधळे, प्रोफेसर मंगल बनवसकर, प्रा. विठ्ठल जाधव, सूरमणी धनंजय जोशी, पत्रकारिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश जोशी आदींसह अनेक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमास ग्रंथालय कर्मचारी आकाश तेलंग, केदार रोकडे, ज्ञानेश्वर पावडे आणि डी. एच. शिंदे यांचे सहकार्य लाभले.

# डॉ. विश्वाधार देशमुख यांचे उद्या व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)–** नरहर कुरुंदकर प्रगत अध्ययन व संशोधन केन्द्राच्या वतीने कवीवर्य पद्मश्री नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त रविवार, दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी सुप्रसिध्द वक्ते व व्यासंगी अभ्यासक डॉ. विश्वाधार देशमुख यांचे 'नारायण सुर्वे नावाचं विद्यापीठ' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

डॉ. विश्वाधार देशमुख हे नांदेडच्या यशवंत महाविद्यालयात मराठीचे प्रोफेसर म्हणून कार्यरत आहेत. नारायण सुर्वे आणि धूमिल यांच्या कवितेचा तौलनिक अभ्यास हा डॉ. देशमुख यांच्या पीएच. डी. संशोधनाचा विषय होता. या विषयावरील त्यांचा ग्रंथही प्रकाशित झाला आहे. त्याच बरोबर 'यात्रा', 'अन्वयार्थ', 'दिंडी', 'मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास', 'पसायधन' आणि 'वाहतो कवितेची पालखी' (कविता संग्रह) अशी त्यांची ग्रंथसंपदा असून, विविध नियतकालिकांत त्यांचे संशोधनपर लेखन प्रकाशित झाले आहे. डॉ. देशमुख हे लोकप्रिय वक्ते असून, महाराष्ट्रात विविध ठिकाणी त्यांची व्याख्याने झाली आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी त्यांचे अनेक उपक्रम लक्षणीय ठरले आहेत.

पीपल्स कॉलेज जवळच्या स्वामी रामानंद तीर्थ संशोधन केन्द्र सभागृहात सायंकाळी ५.३० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमास रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# अपघातात मृत्यू झालेल्या दोन महिलांवर अंत्यसंस्कार

**किनवट (प्रतिनिधी)–** खासगी ट्रॅव्हल्स, भरधाव कंटेनरच्या धडकेत मृत्युमुखी पडलेल्या सुजाता नेम्मानीवार व माधवी तिरमनवार या दोन महिलांवर शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजी येथील वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

किनवट येथील महिला एका धार्मिक कार्यक्रमासाठी गुरुवार, दि. १३ रोजी एका खासगी ट्रॅव्हल्सने किनवटहून हैदराबादकडे जात होत्या. निझामाबादच्या आरमूर गावाजवळ ट्रॅव्हल्स पंक्चर झाल्याने चालकाने ट्रॅव्हल्स रस्त्याच्या बाजूला उभी केली होती. पंक्चर काढण्याचे काम सुरू असतानाच एका भरधाव कंटेनरने उभ्या ट्रॅव्हल्सला जोरदार धडक दिली. या भीषण दुर्घटनेत भाजपाचे माजी जिल्हा उपाध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष अशोक नेम्मानीवार यांच्या पत्नी सौ. सुजाता अशोक नेम्मानीवार तसेच माजी नगराध्यक्ष गोविंदराव तिरमनवार यांची सून, पत्रकार किरण तिरमनवार-किनवटकर यांची पत्नी सौ. माधवी किरण तिरमनवार ह्या जागीच मृत्युमुखी पडल्या.



या अपघातात अन्य दोन महिला गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांची तब्येत स्थिर असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, मृत महिला सुजाता नेम्मानीवार व माधवी तिरमनवार यांच्या पार्थिवावर शुक्रवारी येथील पैनगंगा नदी तिरावरील कैलास मोक्षधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. दुर्घटनेचे वृत्त कळताच आ. भीमराव केराम, आ. हेमंत पाटील यांच्यासह अनेकांनी नेम्मानीवार, तिरमनवार कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

# १७ ऑगस्टपासून वीज ग्राहक समाधान शिबिरांचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** महावितरणतर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांच्या जागृतीसाठी व ग्राहक तक्रार निवारणासाठी १७ ऑगस्ट २०२६ पासून महावितरणच्या प्रत्येक उपविभाग स्तरावर ग्राहक तक्रार समाधान शिबिरांचे आयोजन मुख्य अभियंता नांदेड यांच्या आदेशान्वये करण्यात आले आहे.

नांदेड परिमंडलातील नांदेडसह परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील प्रत्येक उपविभागीय कार्यालय परिसरात सकाळी १० ते दुपारी २ वाजेच्या दरम्यान ही शिबिरे होणार आहेत. रविवारचे दिवस वगळून १७ ऑगस्टपासून २४ सप्टेंबर २०२६ पर्यंत अनुक्रमे नांदेड शहर उपविभाग १, नांदेड शहर उपविभाग २, नांदेड एमआयडीसी, नांदेड ग्रामीण, अर्धापूर, कंधार, लोहा, मुदखेड, धर्माबाद, मुखेड, नायगाव, देगलूर, बिलोली, भोकर, हदगाव, हिमायत नगर, किनवट, माहूर, उमरी, परभणी शहर, परभणी ग्रामीण, गंगाखेड, पुर्णा, पालम, पाथ्री, सेलू, मानवत, सोनपेठ, जिंतूर, औंढा (ना.), वसमत, हिंगोली, कळमनुरी व सेनगाव येथे ही शिबिरे होणार आहेत. शिबिरात वीज ग्राहकांच्या वीज बीलविषयक तक्रारींसह इतरही तक्रारी सोडविण्यात येतील. शिवाय, स्मार्ट मीटरबाबत शंका समाधान, घराच्या छतावरील सौर वीज निर्मितीच्या स्मार्ट योजना, मागेल त्याला सौर कृषीपंप आदी योजनांसदर्भात जागृतीही करण्यात येणार आहे.

संबंधित उपविभागाने ठरवून दिलेल्या दिवशी ग्राहकांनी आयोजित वीज ग्राहक समाधान शिबिरात सहभागी होऊन विविध वीज योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात येत आहे.

# स्वारातीम विद्यापीठात 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत तिरंगा रॅली उत्साहात

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 'तिरंगा रॅली'चे उत्साहात आयोजन करण्यात आले. देशभक्तीपर घोषणांनी आणि तिरंग्याच्या अभिमानाने विद्यापीठ परिसर भारावून गेला.



विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर जी. चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी आंतरविद्याशाखीय अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम आदींची उपस्थित होती.

रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. हातात तिरंगा घेऊन विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणा देत स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणीत केला. 'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकामध्ये राष्ट्रध्वजाबद्दल अभिमान, राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना अधिक दृढ करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने या रॅलीचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. मारुती गायकवाड यांच्या संयोजनातून तसेच विद्यापीठ परिसर कार्यक्रमाधिकारी डॉ. नंदकुमार बोधगिरे यांच्या सहकार्याने रॅली यशस्वीपणे पार पडली.

# मनपा सिडको क्षेत्रीय कार्यालय व सिडको कार्यालयात स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ८० व्या वर्धापनदिनानिमित्ताने उपआयुक्त गंगाधर ईरलोड यांच्या हस्ते १५ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता ध्वजारोहण, तर सिडको कार्यालय नवीन नांदेड सकाळी ७.३५ वाजता सहायक विकास अधिकारी के.व्ही राजपूत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे.

या सोहळ्याला आजी-माजी लोकप्रतिनिधींसह नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सहायक आयुक्त डॉ. मिर्झा बेग, कार्यालय अधीक्षक विलास गजभारे, वसुली पर्यवेक्षक वंसत कल्याणकर, नारायण आठवले, संजय नागापूरकर, स्वच्छता निरीक्षक अर्जुन बागडी, किशन वाघमारे व सिडको कार्यालय यांच्या वतीने करण्यात आले आहे.

सिडको कार्यालय येथे आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन वसुली लिपीक संकेत गिरी यांनी केले आहे.

# संभाजी वरवटकर यांचे निधन



**उमरी (प्रतिनिधी)–** येथील रहिवासी व परिवहन महामंडळ भोकर आगाराचे निवृत्त कर्मचारी संभाजी तुळशीराम वरवटकर यांचे १४ ऑगस्ट रोजी सकाळी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. उमरी तालुक्यातील कृषी सहायक संदीप वरवटकर व मुंबई येथील महावितरण कंपनीचे कर्मचारी सचिन वरवटकर यांचे ते वडील होत.

# डॉमिनोजनंतर बर्गर किंगवर 'एफडीची'ची कारवाई; पुण्यातील कँप शाखेचा परवाना जागेवरच रद्द!

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यभर धडाकेबाज कारवाई करणाऱ्या तुकाराम मुंढे यांच्या एफडीएने आता पुण्यामध्ये मोठी कारवाई केली आहे. पुण्यातील कँप परिसरातील बर्गर किंगमध्ये अन्नसुरक्षा आणि स्वच्छतेच्या गंभीर त्रुटी आढळून आल्यामुळे त्याचा परवाना रद्द करण्यात आला आहे. दररोज हजारो खवय्यांची तुफान गर्दी होणाऱ्या या आऊटलेटवर थेट परवाना रद्द करण्याची कारवाई झाल्याने पुणेकर खवय्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

मुंबईत डॉमिनोज पिझ्झावर धडक कारवाई केल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने आता आपला मोर्चा पुण्यातील प्रसिद्ध फूड जॉईंट्सकडे वळवला आहे. पुण्यातील कँप परिसरात असलेल्या अत्यंत सुप्रसिद्ध 'बर्गर किंग'वर एफडीएने अचानक छापेमारी करत शाखेचा अन्न परवाना जागेवरच रद्द केला आहे.

एफडीएच्या अधिकाऱ्यांनी कँप येथील बर्गर किंग आऊटलेटला अचानक भेट देऊन पाहणी केली असता, तेथे अन्नसुरक्षा आणि गुणवत्तेसंदर्भात अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्या. प्रचंड अस्वच्छता : किचन आणि अन्न साठवणुकीच्या जागी भीषण अस्वच्छता आढळली, जे कारवाईचे प्रमुख कारण ठरले. अन्न मानकांचे उल्लंघन : खाद्यपदार्थ तयार करताना आणि साठवताना एफडीएच्या नियमावलीचे स्पष्ट उल्लंघन होत असल्याचे समोर आले.

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री अब्दुल हनीफ म. अब्दुल रज्जाक रा. नांदेड ता. जि. नांदेड यांनी मौ. म्हाळजा ता. जि. नांदेड येथील सर्वे नं. १७ प्लॉट क्र. ०५ क्षेत्र ९९०.२४ चौ.मी. हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार अकृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. म्हाळजा ता. जि. नांदेड येथील सर्वे नं. १७ प्लॉट क्र. ०५ क्षेत्र ९९०.२४ चौ.मी. जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार अकृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही,असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यांत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

उपजिल्हाधिकारी (महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड

# महाराष्ट्रात ११७ फास्ट ट्रॅक कोर्ट, १.३५ लाखांहून अधिक प्रकरणे प्रलंबित

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – देशात सध्या कार्यरत असलेल्या फास्ट ट्रॅक कोर्टांची (जलद गती न्यायालये) एकूण संख्या ८८४ असून, १७,५४,६७५ प्रकरणे प्रलंबित आहेत. तर दुसरीकडे, महाराष्ट्रात ११७ फास्ट ट्रॅक कोर्ट असून १,३५,३४० प्रकरणे प्रलंबित असल्याची माहिती समोर आली आहे. विधी आणि न्याय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) अर्जुनराम मेघवाल यांनी राज्यसभेत प्रश्नकाळादरम्यान एका लिखित उत्तरात हे आकडे जाहीर केले. माजी केंद्रीय मंत्री आणि काँग्रेस खासदार मुकुल वासनिक यांनी विचारलेल्या प्रश्नावर हे उत्तर देण्यात आले असून, हे आकडे ३० जूनपर्यंतचे आहेत.

## पवित्र प्रणाली अंतर्गत शिक्षण सेवक पदभरती जाहिरात

**संस्था कोड - 271508SC015**

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षण प्रसारक मंडळ, आरळी ता. बिलोली जि. नांदेड संचलित शाखेतील 100% अनुदानित रिक्त पद पवित्र प्रणाली मार्फत सन 2025-26 या शैक्षणिक वर्षात खालील प्रमाणे शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदी नेमणूक करण्यासाठी जाहिरात देत आहोत.

| अ.क्र. | पद | वर्ग | विषय | माध्यम | शैक्षणिक पात्रता | प्रवर्ग | पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षण सेवक | इ.6 ते 8 वी | सर्व विषय | मराठी | पदवीधर+ डिप्लोमा B.Sc. | अनुसूचित जाती (SC) | 1 |

नोट :-
1) पात्र उमेदवारांनी http://talt2025.mahateacherrecritment.org.in या संकेतस्थळावर अर्ज करावा.
2) उमेदवार हा TET-2 / CTET-2 पास असावा.
3) सदर भरती प्रक्रिया ही पवित्र प्रणालीवर दिलेल्या सुचना व नियमांच्या आधारे करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
अध्यक्ष/सचिव
डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षण प्रसारक मंडळ,
आरळी ता. बिलोली जि. नांदेड

## टी.सी. हरवली

माझी प्रियंका उत्तमराव मिरगाजी या नावाची दहावी पासची टी.सी. किनवट ते नांदेड बस प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क पत्ता – प्रियंका उत्तमराव मिरगाजी**
**रा. गोकुळ नगर नांदेड**
**मो.नं. ९७६३०८७३७०**

## टी.सी. हरवली


माझी स्वामी गजानन अशोक या नावाची बारावी कला पासची टी.सी. व गुणपत्रक नांदेड ते बरबडा बस प्रवास करत असताना हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर आणून द्यावी योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क पत्ता – स्वामी गजानन अशोक मु.पो. बरबडा ता. नायगाव जि. नांदेड**
**मो.नं. ८४८५८१८७४४**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लॅब्रा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



जा.क्र. नांवाशमनपा/उद्यानवि / /२०२६ नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड दि. १४/०८/२०२६

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील प्रमाणे कार्यालय प्रमुख व नागरिकांनी महानगरपालिका हद्दितील व्यांग्या मालकीचे/तथा सार्वजनिक तसेच शासकीय जमिनीवरील झाडे तोडण्यासाठी परवानगी मिळणे बाबत महानगरपालिकेकडे अर्ज सादर केले असुन सदर प्रकरणी कुणाचा आक्षेप असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन सात (०७) दिवसात आक्षेप या कार्यालयात लेखी स्वरुपात सादर कराया. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाबाबत विचार केला जाणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

विषय क्र.१) :- कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांचा वृक्षतोड परवानगी अर्ज दि. १०.०७.२०२६ अन्वये कलामंदीर मागातील रस्त्यावरील फुटपाथ काढून रस्ता रुंदीकरणाचे कामात ०३ वृक्ष तोडणे बाबत.

विषय क्र. २) :- श्री तुकाराम मनोहर पांपटवार रा. हडको नांदेड यांचा वृक्षतोड परवानगी अर्ज दि.३१.०७.२०२६ अन्वये कडूनिंब जातीचे वृक्ष धोकादायक वाढलेले असुन वाकले असल्यामुळे धोकादायक वृक्ष तोडणे बाबत.

विषय क्र. ३) :- श्री तुकाराम मनोहर पांपटवार रा. वैभवनगर नविन हडको, नांदेड यांचा वृक्षतोड परवानगी अर्ज दि. ३१.०७.२०२६ अन्वये संबंधितांच्या घराला लागुन असलेले लिंब जातीचे ०१ वृक्ष तोडणे बाबत.

विषय क्र. ४) :- श्री पुंडलीक गंगाराम वैद्य रा. असर्जन यांचा वृक्षतोड परवानगी अर्ज दि.०४.०८.२०२६ अन्वये पिंपळाचे वृक्ष तोड असल्या कारणामुळे सदरील वृक्ष तोडणे बाबत.

विषय क्र. ५) :- अब्दुल खय्युम बागवान पिता अनवर बागवान रा. खय्युम प्लॉट नांदेड यांचा वृक्षतोड परवानगी अर्ज दि.१३.०८.२०२६ अन्वये त्यांच्या दुकानाच्या शटरसमोर असलेले ०१ चिचेचे वृक्ष अडचण निर्माण करत असल्यामुळे तोडणे बाबत.

विषय क्र. ६) :- प्रबंधक जिल्हा न्यायालय, जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड यांचा वृक्षतोड परवानगी अर्ज दि. १३.०८.२०२६ अन्वये जिल्हा न्यायालय परिसरातील गार्डन मधील ०२ अशोकाचे वृक्ष तोडणे बाबत.

स्वा/–
वृक्ष अधिकारी
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

# अठरावे पुण्यस्मरण



## कै. शिवाजीराव माणिकराव पाटील सावळे

यांच्या अठराव्या पुण्यस्मरणानिमित्त **विनम्र अभिवादन...!**

**- अभिवादनकर्ते -**

**श्रीमती अनुसयाबाई शिवाजीराव पाटील सावळे** (पत्नी),
**गणेशराव पाटील सावळे** (मुलगा)
(मा. अध्यक्ष, सम्न्वय समिती ता. लोहा, तथा मा. जि.प. सदस्य),
**सौ. ज्योती गणेशराव पाटील सावळे** (मुलगा-सुन),
**सौ. अंजली रमेशराव पाटील सावळे** (मुलगा-सुन),
**सौ. सुनिता व्यंकटराव पाटील सावळे** (मुलगा-सुन),
**श्रीमती जयश्री प्रभाकरराव पाटील ताटे नरसीकर** (मुलगी),
**सौ. रंजना व्यंकटराव पाटील कल्याणकर** (गोगदरी, मुलगी-जावई),
**सौ. किशोरी गणेशराव पाटील पोमनाळकर** (नात-जावई),
**सौ. मयुरी सुयोग पाटील भुतावळे** (नात-जावई),
**सौ. किरण श्रीनिवास पाटील उबाळे मारतळेकर** (नात-जावई)
**सुरज, शरद, सौरभ, साईप्रसाद, सचिन, विशाल, अभीजित, साईनाथ, कु. शिवानी, कु. ग्रीशा, पृथ्वी, कु. सानवी, राजविर, कियांश** (नातु-नात)

**व समस्त सावळे पाटील परिवार, धनंज (खु) ता. लोहा, जि. नांदेड**

## जाहीरनामा
### नगर पंचायत हिमायतनगर

प्रकरण : बांधकाम परवानगी बाबत.

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सुनंद प्रकाश बनसोडे रा. हिमायतनगर जि. नांदेड यांनी हिमायतनगर नगर पंचायतीच्या हद्दीत असलेल्या खालील प्रमाणे चतुः सिमा दर्शविल्या प्रमाणे शेत सर्व्हे नं. .... मधील मालमत्ता / घर क्र. ३७ वार्ड क्र. ०८ चे रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुल बांधकामास परवानगी मिळणे करिता या कार्यालयात अर्ज दिलेला आहे. तरी सदरील बांधकामबद्दल कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीरनाम्याच्या प्रसिद्धी तारखेपासून ७ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयात सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. नियमाप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : लक्ष्मी उत्तम बनसोडे,
**पश्चिमेस** : लक्ष्मी विठ्ठल बनसोडे,
**दक्षिणेस** : संतोष तुळशीराम बनसोडे,
**उत्तरेस** : कब्रस्तान मुस्लिम.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
### नगर पंचायत, हिमायतनगर

जा.क्र. ८९३

नाव परिवर्तन वार्ड क्र. २० मालमत्ता क्र. ४०७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख सादीक शेख ईमाम रा. बेस्ट कॉलनी हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४०७ वार्ड २० सरदार खान खलील खान पठान यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १४२१/२५ दि. ../../.... च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट क्र. ९,
पश्चिमेस – प्लॉट क्र. ७,
दक्षिणेस – डॉ. उबेद खान यांचे शेत, उत्तरेस – ९ मीटर रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
### नगर पंचायत, हिमायतनगर

जा.क्र. ५७७

नाव परिवर्तन वार्ड क्र. २० मालमत्ता क्र. ४१८ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मोहम्मद सद्दाम हुसेन मोहम्मद जमीर रा. मुजाहिद नगर निजामाबाद यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ४१८ वार्ड २० सरदार खान खलील खान पठान यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १४३०/२५ दि. ०८/१२/२०२५ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट नं. १८,
पश्चिमेस – प्लॉट नं. २०,
दक्षिणेस – ०६ मीटरचा रस्ता,
उत्तरेस – हिनाबी सय्यद अमेर.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
### नगर पंचायत, हिमायतनगर

जा.क्र. ५७६

नाव परिवर्तन वार्ड क्र. २१ मालमत्ता क्र. ५२५ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, रामेश्वर शेषराव कंदलवाड रा. नायगाव ता. नायगाव यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५२५ वार्ड २१ सय्यद सारेख अली सय्यद अजहर अली यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ९८८/२६ दि. ०७/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – बोरगडी रस्ता,
पश्चिमेस – सर्व्हे नं. ८४,
दक्षिणेस – प्लॉट क्र. ६८ व ७१,
उत्तरेस – सर्व्हे नं. ८४.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
### नगर पंचायत, हिमायतनगर

जा.क्र. ५७५

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ मालमत्ता क्र. १६५ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शिवराम कैलास काईतवाड रा. बोरगडी हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १६५ वार्ड १८ सुनिल रमाकांत पांपटवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ९४३/२६ दि. २१/०७/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – मालमत्ता क्र. १६६,
पश्चिमेस – मालमत्ता क्र. १६४,
दक्षिणेस – अंतर्गत रस्ता,
उत्तरेस – मालमत्ता क्र. १७०.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
### नगर पंचायत, हिमायतनगर

जा.क्र. ५७४

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७ मालमत्ता क्र. ७२६, ७२७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मोहम्मद अत्ताउलहक्क खुरेशी मोहम्मद अहसानुल हक्क रा. तेली चौक, गोलकुंडा हैद्राबाद यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ७२६, ७२७ वार्ड १७ महमुद रहेमान फारूखी यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ९०२/२६ दि. ०७/०७/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट नं. ६८, ६९,
पश्चिमेस – २० फुटाचा रस्ता,
दक्षिणेस – प्लॉट नं. ७६,
उत्तरेस – ३० फुटाचा रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
### नगर पंचायत, हिमायतनगर

जा.क्र. ५७३

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ अ मालमत्ता क्र. ६५५ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सय्यद मकसुद सय्यद महेमुद रा. शिवाजीनगर ता. किनवट यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ६५५ वार्ड १८ अ जलाल खान मगदुम खान यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १०१२/२६ दि. ११/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट नं. ५६,
पश्चिमेस – २० फुटाचा रस्ता,
दक्षिणेस – प्लॉट नं. ५०,
उत्तरेस – प्लॉट नं. ४८.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
### नगर पंचायत, हिमायतनगर

जा.क्र. ५७२

नाव परिवर्तन वार्ड क्र. २१ मालमत्ता क्र. ५६५ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सबीया बेगम सय्यद साजीर रा. मोमीनपुरा, हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५६५ वार्ड २१ सय्यद सारेख अली सय्यद अजहर अली यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ९७४/२६ दि. ०४/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – ३० फुटाचा रस्ता,
पश्चिमेस – प्लॉट क्र. १०८,
दक्षिणेस – ३० फुटाचा रस्ता,
उत्तरेस – प्लॉट क्र. १०७.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
### नगर पंचायत, हिमायतनगर

जा.क्र. ५७१

नाव परिवर्तन वार्ड क्र. २१ मालमत्ता क्र. ५६४ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सबीया बेगम सय्यद साजीर रा. मोमीनपुरा, हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५६४ वार्ड २१ सय्यद सहेजाद अली सय्यद अजहर अली यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ९७३/२६ दि. ०४/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट क्र. १०९,
पश्चिमेस – २० फुटाचा रस्ता,
दक्षिणेस – ३० फुटाचा रस्ता,
उत्तरेस – प्लॉट क्र. १०६.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
### नगर पंचायत, हिमायतनगर

जा.क्र. ५७०

नाव परिवर्तन वार्ड क्र. २१ मालमत्ता क्र. ५४२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सय्यद अलीम सय्यद साजीद रा. मोमीनपुरा, हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५४२ वार्ड २१ नजीब खान युसुफ खान यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ९७५/२६ दि. ०४/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – २० फुट रस्ता,
पश्चिमेस – प्लॉट क्र. ५१,
दक्षिणेस – ३० फुट रस्ता,
उत्तरेस – प्लॉट क्र. ८७.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
### नगर पंचायत, हिमायतनगर

जा.क्र. ५६९

नाव परिवर्तन वार्ड क्र. २१ मालमत्ता क्र. ५४३ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, सय्यद अलीम सय्यद साजीद रा. मोमीनपुरा, हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५४३ वार्ड २१ हबीब मोहम्मद वहिदोद्दीन यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १००७/२६ दि. ०५/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – २० फुट रस्ता,
पश्चिमेस – प्लॉट क्र. ५०,
दक्षिणेस – प्लॉट क्र. ८६,
उत्तरेस – प्लॉट क्र. ८८.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
### नगर पंचायत, हिमायतनगर

जा.क्र. ५६८

नाव परिवर्तन वार्ड क्र. २१ मालमत्ता क्र. ५०६, ५०७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, समरीन बेगम सय्यद अलीम रा. मोमीनपुरा, हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ५०६, ५०७ वार्ड २१ राजू वसंतराव बेजकीवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १००६/२६ दि. ०५/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – प्लॉट क्र. ६८ व ८७,
पश्चिमेस – ३० फुट रस्ता,
दक्षिणेस – ३० फुट रस्ता,
उत्तरेस – प्लॉट क्र ४९.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
### नगर पंचायत, हिमायतनगर

जा.क्र. ५६७

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ अ मालमत्ता क्र. ६७७ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख इलियास शेख सलाम रा. उमर चौक, हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ६७७ वार्ड १८ अ शेख जहूर शेख मसुद यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. १०१३/२६ दि. १०/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – शेख अजीम शेख वली,
पश्चिमेस – २० फुट रस्ता,
दक्षिणेस – अंतर्गत रस्ता,
उत्तरेस – २० फुट रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
### नगर पंचायत, हिमायतनगर

जा.क्र.५६६

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०१ मालमत्ता क्र. २२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, रोशनी शंकर गुंडेवार रा. कालिका गल्ली, हिमायतनगर ता. हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २२ वार्ड ०१ शंकर नरसिंगा गुंडेवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. २५७२/२६ दि. १२/०८/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.

पूर्वेस – धरमपुरी गुंडेवार,
पश्चिमेस – बोळ,
दक्षिणेस – रस्ता,
उत्तरेस – गपणत गुंडेवार.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**








**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com